**चित्रा दर्भे-देशपांडे - मुलांमध्ये साहित्य संगीतादी कलांची रुजवण करणारी**

**‘आकार’ ची संस्थापिका !!**






चित्रा दर्भे १९७५ या साली मॅट्रिक झालेली, ग. ग. हायस्कूल, नाशिक.
या शाळेची विद्यार्थिनी. ‘सिम्बॉयसिस’, पुणे या शाळेमधून संगीत शिक्षिका म्हणून २०१८ साली निवृत्त झाली.आताच्या या काही वर्षांमध्ये तिनं केलेली कामगिरी फार कौतुकास्पद आहे. चित्रा गेल्या ६ वर्षापासून 'आकार' या संस्थेची संस्थापिका असून लहान मुलांमध्ये साहित्य संगीतादी कलांची रुजवण करण्याची जणू चळवळ चालवते आहे. काय आहे हे 'आकार'? ही माहिती आहेच पुढे पण त्यापूर्वी थोडी पार्श्वभूमी जाणून घेऊ या.

ग. ग. हायस्कूलचे समृध्द सांस्कृतीक वातावरण तिच्या छंदांना पोषक असंच होतं. तिच्या सुरेल आवाजासाठी गाणं, निरनिराळी वाद्य वाजवायला मिळणं तिला खूप उपयोगी पडलं. घरात नाटकाची वगैरे कसलीही पार्श्वभूमी नसतानाही तिनं नाट्यक्षेत्रात भरीव कामगिरी केली. काही डॉक्युमेन्ट्रीज मध्ये काम केलं. एक गुणी अभिनेत्री असा लौकीक मिळवला. प्रसिध्दी, कौतूक, पारितोषिकांच्या शिखरावर असतानाच यशस्वी कारकीर्द आणि मातृत्वाच्या, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यापैकी तिनं जबाबदाऱ्या निवडल्या. नाट्यक्षेत्रातले काम थांबवले. दरम्यान पं. विजयागौरी बोकील यांच्याकडून संगीत शिकून संगीतामधे विषारद केलं. तिच्याच मुलांच्या शाळेत 'आदर्श इंग्लिश मिडीयम,' नाशिक येथील शाळेत संगीत

शिक्षिकेची संधी चालून आली. नंतर पुण्यात आल्यावर ‘सिम्बॉयसिस’ या शाळेत संगीत शिक्षिका म्हणून काम केलं.

आपल्याला नक्की काय हवंय, याबद्दल तिचे विचार स्पष्ट होते. ती म्हणते 'संगीत शिक्षिका ही फक्त शिक्षिका म्हणूनच निवृत्त होते. म्हणजे प्रगतीसाठी कुठे वाव नाही. संगीत शिक्षिकेला उच्च पद किंवा बढती या गोष्टींसाठी वाव नाही.’ काहीतरी भरीव कामगिरी हातून व्हावी अशी इच्छा स्वस्थ बसू देत नव्हती. मुलांमध्ये वावरत असताना समाजात होत गेलेले बदल, पालकांचा स्वतःच्या मुलांकडे बघण्याचा बदललेला दृष्टिकोन एकंदरच त्यायोगे होणारा भाषा, संस्कृती, आणि जीवनमूल्यांचा ऱ्हास तिला खटकत होता. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचं आक्रमण आणि त्या माध्यमाचं पालकांचं आंधळं आकर्षण हे स्वस्थपणे पहात बसणं तिला शक्य होईना. मग यासाठी आपण काय करणार आहोत याचा विचार ती करू लागली. मुलांवर कसे संस्कार असावेत या बद्दल तिच्या कल्पना स्पष्ट होत्या.

माध्यम हा अडसर न राहता काहीतरी जीवनमूल्यांची, संस्कारांची मुलांना ओळख व्हावी व पालकांना पण त्याची जाणीव व्हावी असा विचार तिच्या मनात आला. पालकांचे मुलांच्या तथाकथित प्रगतीचे निकष किती बेगडी आहेत, स्पर्धेच्या नावाखाली मुलांची होणारी फरफट, नुसते पैसे खर्च करून मुलांना सर्वगुणसंपन्न करण्याचा अट्टाहास, आणि त्यामुळे समाजावर होणारे दीर्घकालीन घातक परिणाम याचे भान मुळात पालकच विसरले आहेत. हे नुसते बघत राहणं तिला शक्य होईना. एवढं करूनही मुलांना फायदा न होता ते त्याचं बालपण हरवून बसलेले आहेत आणि याची पुसटशी जाणीवही पालकांना नाही याची तिला खंत वाटत होती.

त्यातूनच 'आकार 'चा जन्म झाला. (आपली आई मुलांच्या आयुष्याला काही तरी आकार देण्यासाठी धडपडते आहे हे समजून चिरंजीव सुदीप याने हे नामकरण केले.) १०-
१७ या वयोगातील मुलंमुली ज्यांना किमान २ वर्षांची संगीतविषयक काही पार्श्वभूमी आहे यांची वेगवेगळ्या शाळांमधून बहिस्थ परीक्षक बोलवून निवड केली. या संस्थेमध्ये आपल्या संस्कृतीची, मराठी भाषेची,साहित्याची ओळख रंजक पद्धतीने करून देण्याचा उद्देश तर होताच पण त्यातून त्यांचा व्यक्तिमत्व विकास कसा होईल यावर भर देण्यात येतो.
संगीत, वाचन, निवेदन, लिखाण, सादरीकरण अशा अनेक अंगाने मुलांवर संस्कार केले जातात.

यात चित्राने एक गोष्ट खूप छान सांगितली. 'वाचन हे अत्यावश्यक आहे'. गाणंसुद्धा वाचावं. गाणं वाचलं की त्या शब्दांशी नातं जुळतं, अर्थ मनात उतरायला लागतो. हे मुलांना मुद्दाम समजावलं जातं. आपलं आयुष्य इतकं वेगवान झालंय की अशा संवेदना, नजाकत याचा अनुभव देणाऱ्या गोष्टींसाठी साठी वेळ ठेवायचा आपण विसरून गेलो आहोत. या
सगळ्या अनुभवांमधून मुलांना आपल्या आजूबाजूच्या अवकाशाचा शोध लागतो. त्या अवकाशाशी असलेलं आपलं नातं, आपल्या सहकाऱ्यांचं नातं, त्यातून निर्माण झालेले नातेसंबंध आणि त्याची जपणूक याचा संस्कार होतो.'

यासाठी अभंग,गीतरामायण, सावरकरांच्या कविता,मराठी महिने आणि सण, देशभक्ती विषयक दर्जेदार साहित्याची निवड केली. त्यामधील भाषा समजण्यासाठी विशेष प्रयत्न केला आहे. त्या गाण्याचे शब्द, त्याची चाल, त्यासाठी निवडले गेलेले राग, सूर, ताल कसे पोषक आहेत व
शब्द ,संगीत यांचे सौंदर्य खुलून आले आहे, असे बारकावे ‘आकार’ मध्ये उलगडून दाखवले जातात. नुसती चाल पाठ करून सादर करणे असे न होता त्यातील सौंदर्यस्थानांचा आनंद मुलांना मिळतो. गायन, वादन, निवेदन सारे काही ‘आकार’ चे कलाकाराच करतात मग या प्रवासात त्या त्या क्षेत्रातले हात पुढे आले. साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर नाव असलेल्या, डॉ वंदना
बोकील, मार्गदर्शक म्हणून उत्तम निवेदक, अभिनेते अभिजित खांडकेकर, संस्थापिका म्हणून कथ्थक नृत्य निपुण अभिनेत्री सुखदा खांडकेकर यासारख्या शैक्षणिक, कला, नृत्य यातील व्यक्ती हरप्रकारे मदतीला आल्या आणि तिनेच घडवलेले काही विद्यार्थी, मुलांचे पालकही.

चित्रा 'आकार' ला आकार देण्यात यशस्वी झाली आहे. मुलांना त्यांच्या बालसुलभ
खेळकरपणाबरोबर स्वतःची जबाबदारी व्यवस्थित समजावून सांगण्याचे काम चित्रा उत्तम करते म्हणून ही मुलंमुली सादरीकरणात कुठेही कमी पडत नाहीत. आज 'आकार' देशविदेशामध्ये पोहोचले आहे. 'स्वतंत्रते भगवती' -४ थे मराठी विश्व साहित्य संमेलन, बँकॉक, स्वा. सावरकर पुण्यतिथी, अंदमान. 'बालगीतरामायण' - ८ वे मराठी विश्व साहित्य
संमेलन, २०१८, दुबई. 'बालगीतरामायण'.- डिसेंबर २०१९ मध्ये श्रीलंकेमध्ये कँडी
शहरात रामायण महोत्सवा मध्ये सादरीकरण, अशा विविध देशांमध्ये 'आकार' पोहोचले आहे.

याचबरोबर महाराष्ट्रात पुणे,पिंपरी-चिंचवड, नाशिक, श्री गोंदवलेकर महाराजांचा मठ अशा अनेक सन्माननीय व्यासपिठांवरून 'आकार'चे कार्यक्रम सादर झाले आहेत.
संगीत,साहित्य,शैक्षणिक,समाजकारण,माहिती-तंत्रज्ञान,प्रशासन,औद्योगिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रांमधील मान्यवर प्रभृतींच्या उपस्थितीत 'आकार'ने सादरीकरण केले आहे. उदा. ३ मे २०१९ रोजी नाशिक मधील 'कालिदास सभागृह' येथे सादर झालेल्या कार्यक्रमाला नाशिकचे पोलीस आयुक्त माननीय श्री. विश्वास नांगरे पाटील यांची सन्माननीय उपस्थिती होती.

आणखी विशेष म्हणजे नाशिक येथील 'आकार'च्या 'बालगीतरामायण' कार्यक्रमामध्ये सर संघचालक, माननीय श्री मोहनजी भागवत यांनी पाठवलेल्या पत्ररूपी आशीर्वादांच अभिवाचन 'आकार'चे विशेष मार्गदर्शक, प्रसिद्ध निवेदक, आणि अभिनेते अभिजित खांडकेकर यांनी केले.

**२६ मे २०१९ रोजी इतिहास घडला! 'आकार' च्या १०० कलाकारांनी एकत्र येऊन महाकवी, आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर आणि श्रेष्ठ संगीतकार बाबूजी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गणेश कला क्रीडा मंच, पुणे. या भव्य मंचावरून 'बालगीतरामायण' सादर करून त्यांना अभिवादन केले**. यावेळी मुलांचे कौतुक करायला माडगूळकर उपस्थित होते.

चित्राबद्दल विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे अभिनव संकल्पना आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी अपार मेहनत! मार्च २०१९ पासून कोरोना प्रादुर्भावामुळे मुलांची तालीम थांबवावी लागली. पण चित्रा थांबलेली नाही. 'आकार' थांबलेले नाही. या कठीण काळातही नवीन तंत्रज्ञान वापरून व्हाट्स अँप, स्काईप, व्हिडिओ कॉल या द्वारा चित्राने 'आकार'ला जोडून ठेवले आहे. काम चालू ठेवले आहे आणि त्यामुळे या कठीण काळात मुलांनाही विरंगुळा मिळतो आहे.

'आकार'च्या या साऱ्या प्रवासात अभिनेत्री,कथ्थक नृत्यांगना सुखदा खांडकेकर(चित्राची कन्या) सुद्धा संस्थापिका म्हणून काम बघते. प्रसिद्ध निवेदक, आणि अभिनेते अभिजित खांडकेकर (म्हणजे मुलांचा लाडका अभिजितदादा, सुखदाचे पती) यांचा 'आकार'मध्ये वेळोवेळी महत्वपूर्ण सक्रिय सहभाग असतो.
सध्या 'आकार' पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथे काम करते आहे. पिंपरी-चिंचवड येथील संगीत विभाग सांभाळायचे काम संगीत विशारद आणि संगीत शिकवण्याचा भरपूर अनुभव

असलेल्या प्रांजल पाडेकर समर्थपणे सांभाळतात. चित्राचा या कामामागचा प्रामाणिक उद्देश आणि तळमळ खूप कौतुकास्पद आहे.याच कारणामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये काम करणारे श्री. शंतनू कुंभारे हरतऱ्हेने मदत करतात. 'आकार' मधील एका मुलाची पालक प्रतिमा पाठे आर्थिक व्यवहार सांभाळण्यासाठी तर शालेय मैत्रीण, ग. ग. हायस्कुलची विद्यार्थिनी माधुरी सुमंत-गयावळ लेखन, निवेदन विभाग सांभाळण्यासाठी पुढे आल्या. इतरही मुलांचे पालक नेहमी सहकार्य करायला तयार असतात. जणू हा सहकार्याचा संस्कारच मुलांवर नकळत घडत असतो.

मराठी भाषा किंवा आपली संस्कृती टिकणार की नाही याचा उहापोह न करत बसता संस्थापिका म्हणून चित्रा दर्भे-देशपांडे आणि सुखदा खांडकेकर ती जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न यशस्वीपणे करत आहेत.

* ही माहिती व हे साहित्य सर्वस्वी माझे आहे. ग.ग. संबंधी whatsapp, G.G. Group ब्लॉग, फेसबुक तसेच स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यस मी स्वखुशीने संमति देत आहे.

नाव -- चित्रा दर्भे

ग. ग . Batch group 1975,

ग ग. SR.NO. 6

मोबाइल नं. --- ९८९००३३५२५ / ९७३०९८१५२५

(शब्दांकन: माधुरी सुमंत- गयावळ)